# सार्वजनिक आरोग्य विभागाचे राज्य प्रशिक्षण धोरण

**प्रस्तावनाः-**

महाराष्ट्र राज्यातील जनतेला अत्याधुनिक व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे ज्ञान व कौशल्य अद्यावत व वृध्दींगत करण्यासाठी निरंतर प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. वैद्यकीय क्षेत्रामध्ये नवनवीन संशोधन निरंतर सुरु असतात व त्यामुळे नवीन आरोग्य कार्यक्रमाचा आरोग्य विभागामध्ये अंर्तभाव करण्यात येत असतो. या नवीन कार्यक्रमांविषयी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती असणे आवश्यक आहे व त्यामुळे राज्यातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना याविषयी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. सध्या राज्य स्तरावर सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत प्रशिक्षण देण्याचे कार्य सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपुर (राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर) येथे तसेच विभागीय स्तरावर आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र व जिल्हा स्तरावर जिल्हा प्रशिक्षण केंद्र व रुग्णालय प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहेत. या सर्व प्रशिक्षण संस्थामध्ये एकसुत्रता आणुन सर्व प्रशिक्षण संस्था अद्यावत करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने या सर्व बाबींचा विचार करुन महाराष्ट्र राज्याचे आरोग्य विषयक प्रशिक्षण धोरण ठरविण्यात येत आहे.

**प्रस्ताव**

१. सार्वजनिक आरोग्य विभागासाठी निश्चित करण्यात आलेले विभागीय प्रशिक्षण धोरण महाराष्ट्र राज्याच्या प्रशिक्षण धोरणातील तरतुदीनुसार सुसंगत असेल. त्यानुसार राज्य स्तरावर सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत तांत्रिक/ प्रशासकिय प्रशिक्षण देण्याचे काम राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर येथे तसेच विभागीय स्तरावर आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र व जिल्हा स्तरावर जिल्हा प्रशिक्षण पथक व रुग्णालयीन प्रशिक्षण केंद्र येथे चालु आहे. या संस्था पुढील काळातही तांत्रिक प्रशिक्षणासाठी शिखर प्रशिक्षण संस्था/ विभागीय प्रशिक्षण संस्था/ जिल्हा प्रशिक्षण संस्था अशा तीन स्तरावर कार्यरत असतील.

२. राज्य प्रशिक्षण धोरणाच्या मध्यवर्ती कल्पनेनुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राज्य प्रशिक्षण धोरणामध्ये खालील बाबी समाविष्ट आहेत.

- सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यासांठी प्रशिक्षण असेल.
- प्रशिक्षण हे गरजांवर आधारीत व निरंतर देण्यात येईल.
- सध्या अस्तित्वात असलेल्या प्रशिक्षण सोयी, सुविधांचे बळकटीकरण व योग्य वापर करण्यात येईल.
- आवश्यकतेनुसार विभागीय व जिल्हा प्रशिक्षण केंद्र व तालुका स्तरावरील प्रशिक्षण केंद्राची निर्मीती करण्यात येईल.
- प्रत्यक्ष प्रशिक्षण आराखडा तयार करणे व त्यानुसार प्रशिक्षणासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करणे.
- विभागाच्या मानव संसाधन विकासाबरोबर प्रशिक्षण जोडले जाईल.
- राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर, ही सार्वजनिक आरोग्य विभागाची शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून कार्यरत राहील.
- सध्या अस्तित्वात असलेल्या प्रशिक्षण संस्थांच्या सोयी सुविधांचे बळकटीकरण राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूरयांचे मार्फत करण्यात येईल.
- राज्य / विभागीय स्तरावर राष्ट्रीय आरोग्य अभियान / विविध आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय / अशासकिय संघटना (युनिसेफ, जपायगो, जागतिक आरोग्य संघटना, आयसीएमआर, एनआयएचएफडब्ल्यु, पाथ, युएनडीपी, पीएचएफआय इ.) मार्फत प्रशिक्षण सल्लागार/ व्यवस्थापक यांची नेमणूक करण्यात येईल.

३. महाराष्ट्र राज्याच्या प्रशिक्षण धोरणासंबंधाने सार्वजनिक आरोग्य विभागात खालीलप्रमाणे समित्यांचे गठण करण्यात येत आहे. (राज्य आरोग्य व कुटूंब कल्याण संस्था, नागपूर)

३.१.१. नियामक मंडळ

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १. | अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | अध्यक्ष |
| २. | सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सहअध्यक्ष |
| ३. | आयुक्त तथा अभियान संचालक, आरोग्य सेवा, मुंबई | सदस्य |
| ४. | सहसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई | सदस्य |
| ५. | संचालक, आरोग्य सेवा, मुंबई | सदस्य |
| ६. | संचालक, आरोग्य सेवा, पुणे | सदस्य |
| ७. | अतिरिक्त संचालक, राज्य आरोग्य कुटुंब कल्याण, पुणे | सदस्य |
| ८. | अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई | सदस्य |
| ९. | सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, मुंबई | सदस्य |
| १०. | सहसंचालक (तांत्रिक), रा.आ.अ., मुंबई | सदस्य |
| ११. | सहसंचालक (अतांत्रिक), रा.आ.अ., मुंबई | सदस्य |
| १२. | प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नागपूर/पुणे | २ सदस्य |
| १३. | अधिष्ठाता, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा**

- सार्वजनीक आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे ज्ञान व कौशल्य विकास वृध्दी करण्यासाठी प्रशिक्षण धोरण कार्यान्वित करणे.
- कार्यकारी समितीने प्रस्तावित केलेल्या वार्षिक प्रशिक्षण आराखडयास मान्यता देणे.
- कार्यकारी समितीने प्रस्तावित केलेल्या प्रशिक्षणाशी निगडीत असलेल्या प्रशिक्षणा व्यतिरिक्त असलेल्या बाबींवर (Non Training Components) मार्गदर्शन करणे व त्यानुसार प्रस्तावांना मान्यता देणे.
- सदर नियामक मंडळाची सभा अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने वर्षातून दोन वेळा घेण्यात येईल.
- नियामक मंडळाने आदेशित केलेल्या मुद्यांवर कार्यकारी समिती कार्यान्वयन करेल.

३.१.२ **कार्यकारी समिती.**

| अ.क्र. | सदस्यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | संचालक, आरोग्य सेवा, पुणे | अध्यक्ष |
| २ | अधिष्ठाता, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर | सहअध्यक्ष |
| ३ | उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळ पूणे/नागपूर | सदस्य |
| ४ | प्राचार्य, आवकुकप्रके, सर्व / उपसंचालक (प्रशिक्षण) विभागिय आरोग्य प्रशिक्षण संस्था | ७ सदस्य |
| ५ | प्राध्यापक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर | सदस्य |
| ६ | मुख्य प्रशासकिय अधिकारी, आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई | सदस्य |
| ७ | जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रुग्णालय, गडचिरोली/पालघर | २ सदस्य |
| ८ | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परीषद, अमरावती/सांगली | २ सदस्य |
| ९ | वैद्यकीय अधिकारी, जि.प्र.केंद्र, जिल्हा वाशिम/नंदुरबार | २ सदस्य |
| १० | लेखा अधिकारी, रा.आ.अ., राआकुकसंस्था, नागपूर | सदस्य |
| ११ | प्रशासकिय अधिकारी, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर | सदस्य सचिव |

**कार्यकारी समितीचीकार्यकक्षा**

- सदर कार्यकारी समितीची बैठक अध्यक्षांच्या मान्यतेने वर्षातून कमीतकमी सहा वेळा घेण्यात येईल. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत सहअध्यक्ष समितीचे बैठक व कामकाज पाहतील.
- नियामक मंडळाने निर्धारित केलेले कार्यक्रमांची अंमलबजावणी करीता कृती आराखडा तयार करुन सर्व कार्यक्रमांचा आढावा घेणे.
- राज्य प्रशिक्षण धोरणाची अंमलबजावणी करणे व अधिनस्त तालुका / जिल्हा / विभागीय स्तरावरील प्रशिक्षण संस्थाचे प्रशिक्षण कार्यक्रम राबविणेसाठी आवश्यक असलेल्या प्रस्तावांची छाननी करुन मान्यता देणे.
- विभागाचे प्रशिक्षण धोरण राबविण्याबाबत तांत्रिक व प्रशासकिय मंजूरी प्रदान करतील.

३.२. राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर या प्रशिक्षण संस्थेला राज्यातील सर्व आरोग्य प्रशिक्षण संस्था संलग्न करण्यात येत असून यापुढे राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर ही राज्यस्तरीय तांत्रिक व प्रशासकिय प्रशिक्षणासाठी शिखर संस्था म्हणून कार्यरत राहील व त्याची कार्ये खालीलप्रमाणे राहतील.

३.२.१. राज्यातील सर्व आरोग्य प्रशिक्षण संस्थांसाठी विविध गुणवत्ता मानके निश्चित करणे, पायाभूत व बढती नंतरच्या प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करणे. विषय वस्तु(Content )बाबत मार्गदर्शन करणे.

३.२.२. परिणामकारक प्रशिक्षणासाठी प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करणे, मुल्यमापन करणे तसेच प्रशिक्षण पुस्तिका तयार करणे, आवश्यकतेनुसार प्रशिक्षण पुस्तिकांचे भाषांतर करणे.

३.२.३. सर्व आरोग्य प्रशिक्षण संस्थेतील संस्थाप्रमुख व विद्याशाखा सदस्य यांच्या आस्थापना विषयक बाबी साभांळणे.

४. सर्व प्रशिक्षण संस्थामध्ये प्रशासकिय नियोजन व संनियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येईल. संस्थेतील प्रशिक्षणाचे नियोजन तसेच प्रशिक्षणाच्या निविष्ठा (Input) प्रक्रिया व प्रशिक्षणाचे परिणाम यांचे संनियंत्रणाची जबाबदारी संबंधित कक्ष सांभाळेल.

४.१ प्रशिक्षण संस्थेसाठी ५ वर्षाची प्रशिक्षण रुपरेषा व वार्षिक प्रशिक्षण आराखडा तयार करणे.

४.२ प्रत्येक पदाला आनुषंगिक अशा प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण अहवाल तयार करणे.

४.३ कर्मचाऱ्यांची योग्य प्रशिक्षणासाठी निवड करणे तसेच सेवाप्रवेश व पदोन्नती अंतर्गत झालेल्या अधिकाऱ्यांना उजळणी प्रशिक्षण देणे.

४.४ प्रशिक्षण कार्यक्रम व प्रत्यक्ष कामकाज यांचा समन्वय साधणे.

५. सार्वजनिक आरोग्य विभाग राज्य ते स्थानिक स्तरापर्यंत प्रत्येक कार्यालयात प्रशिक्षण सल्लागार / व्यवस्थापक नेमण्याची कार्यवाही करतील. प्रशिक्षण सल्लागार /व्यवस्थापक संबंधित विभागाच्या कार्यालयाच्या संबंधित स्तरासाठी अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबत पुढील प्रमाणे कार्य करतील.

- प्रत्येक योजना व कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी काही आर्थिक तरतूदीनुसार आराखडा तयार करणे.
- विभागामध्ये प्रशिक्षण देण्याकरिता अर्थसंकल्पिय तरतूद प्राप्त करुन घेण्यासाठी प्रस्ताव तयार करणे.
- संस्थेसाठी ५ वर्षाची प्रशिक्षण रुपरेषा व वार्षिक प्रशिक्षण आराखडा तयार करणे.

६. **प्रशिक्षणाचे प्रकार**

६.१ सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यासतांत्रिक, प्रशासकिय व सेवांतर्गत प्रशिक्षण आवयश्यकतेनुसार राज्यस्तर, देशपातळीवर किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

६.२ **तांत्रिक प्रशिक्षणाची रचना व अंमलबजावणीचा आराखडा–**

सदर प्रशिक्षण सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त संस्थांच्या मूळ तांत्रिक कामकाजाशी संबंधित असेल. तांत्रिक प्रशिक्षणाची आखणी, विकसन, नियोजन, समन्वय, अंमलबजावणी तसेच प्रशिक्षणार्थीचे मूल्यमापन करुन त्यांना प्रमाणित करण्याची जबाबदारी राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर यांची राहील. त्यासाठी सर्व संस्थेच्या पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यात येईल. बदलीने नियुक्ती झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कामाचे स्वरुपानुसार काम करण्यासाठी विशिष्ट ज्ञानाची आवश्यकता असल्यास, अशा अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिपत्याखालील प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे. संबधित विभागांनी तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी वार्षिक प्रशिक्षण आराखडा तयार करुन खर्चाची तरतूद करावी.

**६.३ प्रशासकिय व सेवातंर्गत प्रशिक्षणाची रचना तसेच अंमलबजावणीचा आराखडा–**

सदर प्रशिक्षणाचे उद्‌दिष्ट हे ज्ञान, कौशल्य आणि दृष्टीकोण यामधील यथायोग्य बदल करण्यासाठी राहील. हे प्रशिक्षण आरोग्य विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक असेल. (उदा.लोक प्रशासन, वैद्यकीय तांत्रिक प्रशिक्षण सामाजिक बांधिलकी, प्रकल्प व्यवस्थापन, सुप्रशासन, व्यवस्थापकीय कौशल्य, अर्थसंकल्पीय बाबी, मनुष्यबळ विकास– आस्थापनाविषयक कामकाज संबधित कायदे, संगणक प्रशिक्षण इ.) सदर प्रशिक्षण, प्रशासनाची सर्वसाधारण क्षमता बांधणी, प्रेरणा व सुयोग्य कामकाजासाठी अतिशय महत्वाचे असल्याने सर्व पदांवरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सदर प्रशिक्षण घेणे बंधनकारक राहिल. प्रशिक्षणाची बांधणी, आखणी, तज्ञप्रशिक्षक तयार करणे, मुल्यमापन, परिक्षेचे वेळापत्रक ठरविणे व प्रमाणपत्रे देणे आदी कामे पाहणारी विकास संस्था म्हणून राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर व विभागीय आरोग्य प्रशिक्षण संस्था तसेच जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्राकडे असेल. हे प्रशिक्षण सर्व पदावरील कर्मचाऱ्यांना विशेषतः त्या पदावर नियुक्त झाल्यानंतर बंधनकारक राहील.

महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य विभागातील अधिकारी/कर्मचारी पुढीलप्रमाणे नमुद केलेल्या टप्प्यांवर प्रशिक्षण देण्यात येईल.

**अ) पायाभूत प्रशिक्षण कालावधी**

| गट | राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर (SIHFW) |
|---|---|
| अ | २ आठवडे |
| ब | २ आठवडे |
| क | २ आठवडे |
| ड | १ आठवडा |

पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नवनियुक्त अधिकारी / कर्मचाऱ्यांना मुळ मुख्यालयी रुजू होण्यापूर्वी प्रशिक्षणास पाठविण्यात येईल. अथवा पायाभुत प्रशिक्षण रुजु झाल्यापासून १ वर्षात पुर्ण करणे आवश्यक राहील. परिविक्षाधिन कालावधी समाप्तीच्या आदेशासाठी पायाभुत प्रशिक्षण समाधान कारकरित्या पुर्ण करणे अनिवार्य असेल. प्रशिक्षणार्थींनी पायाभूत प्रशिक्षण समाधानकारकरीत्या पूर्ण करणे आवश्यक राहील.

**आ) पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण कालावधी**

| गट | राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर (SIHFW) |
|---|---|

| | |
|---|---|
| अ | २ आठवडे |
| ब | २आठवडे |
| क | १ आठवडे |

पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण विशेषतः पदोन्नतीनंतर बदललेल्या जबाबदाऱ्या व कामाचे स्वरुप याबद्दल असल्याने प्रशासकीय प्रशिक्षणाचा कालावधी विभागाचे प्रशिक्षण धोरणाच्या तरतूदीनुसार असेल. तांत्रिक / प्रशासकिय प्रशिक्षणाबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध स्तरांवरील प्रशिक्षण संस्थाकडून प्रशिक्षणाचे नियोजन व आयोजन करण्यात येते ते विभागाच्या तांत्रिक / प्रशासकिय प्रशिक्षण कार्यक्रमानुसार घेण्यात येईल. (प्रशिक्षण पदोन्नती नंतर १ वर्षात पुर्ण करणे आवश्यक राहील.)

**इ) उजळणी प्रशिक्षण**

१) सर्व संवर्गाकरीता उजळणी प्रशिक्षण किमान ४ ते ६ वर्षातून एकदा देण्यात येईल.

२) प्रशिक्षणाचा कालावधी ३ दिवसांसाठी असेल.

**७. प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यासाठीची व्यवस्था व प्रशिक्षण संस्थांची कार्येः-**

**७.१ राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर** (SIHFW)–राज्यस्तरीय सार्वजनिक आरोग्य शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून कार्य करेल. प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण करतील. बहुउद्देशिय आरोग्य सेवक(पू.) मुळ प्रशिक्षण व सेवा अंतर्गत कनिष्ठ/ वरिष्ठ लिपीकप्रशिक्षण व लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या अनुषंगानेपर्यवेक्षकीय प्रशिक्षण विभागीय स्तरावर आयोजित करतील व परीक्षा संदर्भात परीक्षा मंडळाचे प्रमुख म्हणून कार्य करतील. विभागाचे कार्यक्रम व योजना यांच्यासाठी सर्व पातळीवरील लोकांना समाविष्ठ करुन विशेष कार्यशाळा घेतील. विभागासाठी प्रशिक्षण पुस्तिका व प्रशिक्षण साहित्य तयार करतील. विभागांच्या प्रशिक्षकांसाठी विषयानुसार प्रशिक्षण आयोजित करतील. विभागाशी संबधित विषयात संशोधन करतील. आवश्यकतेप्रमाणे विभागाचे कार्यक्रम व योजना यांचे मुल्यमापन करतील. त्याचप्रमाणे शासकीय धोरण, योजना व कार्यक्रमात उचित बदल आणण्यासाठी शासनाला शिफारस करतील. आरोग्य विभागांच्या सर्व प्रशिक्षण संस्थांचे मुल्यमापन वरिष्ठ प्रशिक्षण संस्था म्हणून राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर (SIHFW) करेल.

- **राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर संस्थेची (SIHFW)प्रमुख उदिष्टे .**

१. राज्यातील इतर प्रशिक्षण संस्था, यशदा, राज्य आरोग्य संसाधन केंद्र, National Cold Chain Resourse Center, State TB Training and Demostration Center, केंद्रशासनाच्या प्रशिक्षण संस्थां National Institute of Health and Family Wealfare, National Heatlh System Resoures Center अंतराष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण संस्था UNDP, ICMR, PHFI FIM यांचेशीसमन्वय साधून परीणामकारक प्रशिक्षणाची अंमलबजावणी करणे.

२. सर्व अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे पदाशी निगडीत भूमिका, कर्तव्य व त्यामध्ये होणारा बदल यासाठी सक्षम बनिवणे.

३. सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे ज्ञान व कौशल्य वृध्दींगत करणे व त्यांच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे.

४. उत्कृष्ट प्रशिक्षक म्हणून भूमिका पार पाडण्यासाठी प्रशिक्षकांचे प्रशिक्षण विषयक कौशल्य वृध्दींगत करणे.

५. प्रशिक्षण विषयक साधन सामुग्री उपलब्ध करुन देणे.

६. आरोग्य विषयक संशोधन करणे आणि त्यानुसार प्रशिक्षणाचा दर्जा उंचाविणे.

**७.२ प्रशासनिक व सेवांतर्गत प्रशिक्षणाची प्रक्रिया ही तीन स्तरावर कार्यान्वित केली जाईल.**

**अ) राज्यस्तर:-**राज्य आरोग्य कुटुंब कल्याण संस्था, नागपूर(SIHFW)ही शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून कार्य करेल. विविध विषयांबाबत प्रशिक्षक तयार करण्याकरीता प्रशिक्षण आयोजित करणे. संगणक व माहिती तंत्रज्ञानामध्ये विकेंद्रित प्रशिक्षण देण्यासाठी प्रमुख संस्था म्हणून काम पाहणे आणि महाराष्ट्र राज्याची व्हर्च्युअल ॲकॅडमी म्हणून दुरस्थ व ई-शिक्षणासाठी राज्य यंत्रणा तसेच प्रलेख व प्रशिक्षण साहित्याची निर्मिती, भाषांतर व प्रसारण करणे. तसेच शासकीय योजनांचा आवश्यकतेनुसार शासनाच्या वतीने आढावा व मुल्यमापन करुन आवश्यक त्या शिफारशी करण्यामध्ये व प्रशिक्षण मुल्यामापनामध्ये राज्य आरोग्य कुटुंब कल्याण संस्था, नागपूर(SIHFW)ची मुख्य भूमिका राहील.सदर संस्थाState Health System Resourse Centerशीसमन्वयाने कार्य करेलत्याचप्रमाणे सदर संस्था नियमितपणे अहवाल सादर करेल.

**ब) विभागीय स्तर:- आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण संस्था (HFWTC)**

कार्ये/ भूमिका पुढीलप्रमाणे -

हि संस्था राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर (SIHFW) यांच्या अधिपत्याखाली कार्यरत राहील. बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (पु.)यांना १ वर्षीय मुळ प्रशिक्षण देणे, राष्ट्रीय आयोडिन न्युनता नियंत्रण कार्यक्रम संबंधित विभागात राबविणे. सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांतर्गताचे प्रशिक्षण, लिपीक संवर्गातील प्रशिक्षण तसेच विशेष योजना व कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी निवडलेल्या गटाकरीता विभागवार विशेष कार्यशाळा आयोजित करणे.त्याखेरीज राज्य स्तरावर संशोधनासाठी माहिती सामुग्रीचे विकसन, मुल्यमापन करणे.

**क) जिल्हास्तर:-**जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्र(DHTC)कार्यरत असतील.

कार्ये/ भूमिका पुढीलप्रमाणे -


जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्र (DHTC) ही संस्था आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण संस्था (HFWTC)यांच्या अधिपत्याखाली कार्यरत राहील. जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्र(DHTC)यांचे प्रशासकीय व तांत्रिक नियंत्रण आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण संस्था (HFWTC) यांच्याकडे राहील. प्रत्येक जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्रात एक विषय तज्ञांचा गट असेल. जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्रात(DHTC) तांत्रिक व अतांत्रिक प्रशिक्षण आयोजित करतील.

- **राज्य आरोग्य संसाधन केंद्र पुणे (State Health Resource Center Pune)**

राज्य आरोग्य प्रणाली संसाधन केंद्राची स्थापना२००८ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत करण्यात आलेली आहे.राष्ट्रीय आरोग्य अभियान या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व जिल्हास्तरावर दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी तांत्रिक सहाय्य देते.

राज्य आरोग्य संसाधन केंद्र पुणे व राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूरया दोन्ही संस्था आरोग्य विभागातील मनुष्यबळाचे ज्ञान व कौशल्य (तांत्रिक व अतांत्रिक) वृध्दींगत करणेकरीता एकमेकांच्या समन्वयाने काम करतील. कार्यकारी संचालक राज्य आरोग्य संसाधन केंद्र पुणे हे संचालक आरोग्य सेवा पुणे यांच्या नियंत्रणा खाली राहतील.

७.३ महाराष्ट्रप्रशिक्षण कार्यक्रम संरचना




**८. अ)विभागाचे प्रशिक्षण विषयक धोरण-**

८.१ सर्व स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे संवर्गनिहाय प्रशिक्षण सत्र आयोजित करणे.

८.२ राज्य प्रशिक्षण धोरणतंर्गत तयार करण्यात आलेले संवर्गनिहाय प्रशिक्षण, प्रशिक्षणाचा कालावधी, प्रशिक्षण स्थळ व अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात येतील.

८.३ अधिकृत असलेल्या प्रशिक्षण स्थळाव्यतीरीक्त आवश्यकतेनुसार व निकषाप्रमाणे खाजगी व स्वयंसेवी संस्थाची प्रशिक्षण स्थळ म्हणून निवड करुन अशा संस्थामध्ये प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात येईल.

८.४ अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तांत्रिक प्रशिक्षण, प्रशासक्रिय व सेवांतर्गत प्रशिक्षण घेण्यात येतील.

८.५ सदर प्रशिक्षण प्रशासनाची सर्वसाधारण क्षमता बांधणी, प्रेरणा व सुयोग्य कामासाठी अतिशय महत्वाचे असल्याने सर्व पदावरील कर्मचाऱ्यांना सदर प्रशिक्षण घेणे बंधनकारक राहील. प्रशिक्षणास गैरहजर असल्यास

सदर प्रशिक्षणार्थी शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे कार्यवाहीस पात्र राहील. नवीन विषयाची तोंडओळख करण्यासाठी विशेष प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात येतील.

८.६ आवश्यकतेनुसार आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षकाला इतर राज्यात, केंद्रशानाच्या प्रशिक्षण संस्थेत व आवश्यकतेप्रमाणे विदेशात प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येईल.

८.७ राज्यातील आरोग्य प्रशिक्षण संस्थांची गुणवत्ता वृध्दींगत करण्यासाठी त्या-त्या संस्थांनी आयएसओ मानांकन प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करतील व त्यानुसार सातत्यपुर्ण सेवा देण्यासाठी प्रयत्नशील असतील.

८.८ प्रशिक्षण संस्थांमध्ये नियुक्त करतांना अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे शैक्षणिक पात्रता प्रशिक्षणाचा अनुभव इत्यादी बाबी गृहीत धरुन नियुक्त करण्यात यावी.

८.९ प्रशिक्षणाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी सध्या आरोग्य प्रशिक्षण संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या प्रशिक्षित अधिकारी व विद्याशाखा सदस्यांची स्थानंतरणाने पदस्थापना प्रशिक्षण संस्थामध्येच करण्यात येईल.

८.१० राष्ट्रीय आरोग्य अभियान व प्रजनन व बाल आरोग्य (आरसीएच) या कार्यक्रमांतर्गत संबंधित प्रशिक्षणाचा खर्च भागविण्यात येईल व त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार पदांची निर्मिती करण्यात येईल.

८.११ राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशासकीय एकसूत्रता येण्याच्या दृष्टीने वरिष्ठ प्रशिक्षण संस्थेचे त्यापेक्षा कनिष्ठ प्रशिक्षण संस्थेवर प्रशासकीय नियंत्रण असणे अंत्यत आवश्यक आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे प्रशासकीय रचना कार्यप्रणाली कार्यरत राहील.

**८.ब) प्रशिक्षण विभाग प्रमुख-** राज्य प्रशिक्षण धोरण अंतर्गत संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर हे प्रशिक्षण विभाग प्रमुख म्हणून घोषित करण्यांत येत आहे.तसेच विभाग प्रमुखांना असलेले सर्व अधिकार प्रदान करण्यात येत आहे. राज्यातील सर्व प्रशिक्षण संस्था प्रशासकिय व तांत्रिक नियंत्रणात राहतील.

तर **संचालक, राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था नागपुर हे या पुढे अधिष्ठाता,राज्य आरोग्य व कुटुंब कल्याणसंस्था नागपुर याप्रमाणे नामनिर्देशित (Dean,State Institute of Health & Family Welfare, Nagpur) करण्यात येत आहे**. अधिष्ठाता हे या संस्थेचा सर्वांगिन विकासासाठी जबाबदार राहतील. त्याच प्रमाणे दर पाच वर्षांनी राज्य प्रशिक्षण धोरणाचा आढावा घेऊन आवश्यक त्या समयोचीत सुधारणा करतील.

तर अधिष्ठाता हे संचालक, आरोग्य सेवा पुणे यांच्या नियंत्रणाखाली कार्य करतील. तसेच सर्व विभागप्रमुख आणि उपसंचालक परिमंडळे यांच्या समन्वयाने कार्य करतील. प्राचार्य आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रे यांचे गोपणीय अहवालासाठी अधिष्ठाता प्रतिवेदन अधिकारी राहतील तर संचालक, राज्य आरोग्य सेवा पुणे हे पुर्नेविलोकन अधिकारी राहतील. इतर मंडळ स्तरीय प्रशिक्षण संस्था प्रमुखांचे गोपणीय अहवाल हे अधिष्ठाता राज्य आरोग्य कुटुंब कल्याण संस्था प्रतिवेदन करतील तर पुर्नेविलोकन संबंधित विभागप्रमुख करतील. अधिष्ठाता, राज्य आरोग्य कुटुंब कल्याण संस्था यांचे प्रतिवेदन संचालक, आरोग्य सेवा पुणे करतील तर पुर्नेविलोकन आयुक्त, आरोग्य सेवा हे करतील. आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्रातील इतर गट अधिकारी यांचे प्रतिवेदन प्राचार्य आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र आणि पुर्नेविलोकनअधिष्ठाता करतील. तर राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था येथीलगट अधिकाऱ्यांचे प्रतिवेदन अधिष्ठाता तर पुर्नेविलोकन संचालक पुणे करतील.

तथापी सेवा विषयक बाबी आणि सेवापुस्तकाबाबत सदयस्थितीत कार्यरत प्रशासकिय व्यवस्था सुरुराहील.

**<u>८.क)प्रशिक्षण कार्यक्रम नियोजन प्रक्रिया(Planning Process)</u>**

- **संस्थास्तर**

**उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामिण, उपजिल्हा, जिल्हा रुग्णालय :-**

✓ संस्थास्तरावरीलप्रशिक्षीत/ अप्रशिक्षीतसंवर्ग निहाय माहिती (Training Matrix)तयारकरणे.

**कालमर्यादा**ः-पहिला व दुसराआठवडाऑक्टोंबर

- **जिल्हास्तर**

**<u>जिल्हाप्रशिक्षण केंद्र व रुग्णलयीनप्रशिक्षण केंद्र :-</u>**

✓ Training Matrixच्याआधारेप्रशिक्षत व अप्रशिक्षीतमनुष्यबळाचीमाहिती घेवूनसर्वआरोग्य विषयककार्यक्रमांचाप्रशिक्षण आराखडातयारकरणे.कार्यान्वीतअसलेल्यातालुक्यांनाप्रशिक्षण केंद्रांच्याकार्यक्षेत्रातीलआरोग्यसंस्थांचाआराखडा घेवुनसमाविष्ठकरणे.

✓ प्रशिक्षणाचीगरज (Training Need Assessment), प्रशिक्षण संस्था/ केंद्र यांची क्षमतातपासुनवार्षिकउद्दिष्टठरविणे.

**कालमर्यादा**ः-तिसराआठवडाऑक्टोंबर

- **विभागीय स्तर**

**<u>आरोग्य व कुटुंबकल्याणप्रशिक्षण केंद्र (सर्व) :-</u>**

✓ विभागांतर्गतउपलब्ध सर्व प्रशिक्षण केंद्रांकडुनप्रशिक्षण कृतीआराखडामागवुन एकत्रितकरणे.

✓ वैदयकिय अधिकारी व विशेषज्ञ यांचेज्ञान व कौशल्य वृदधींगतकरणेकरीताविभागीय स्तरावरआखणीकरणे.

✓ प्रशिक्षण भाराच्याअनुषंगाने नवीनकौशल्य प्रशिक्षण केंद्र (Skill Training Site) निवडकरणे.

**कालमर्यादा**ः-पहिलाआठवडानोव्हेंबर

- **राज्यस्तर**

**<u>राज्य आरोग्य व कुटुंबकल्याणसंस्थानागपुरः-</u>**

✓ आरोग्य विभागातीलसर्वकार्यक्रमप्रमुखांकडुनत्यांच्यासंबंधीतकार्यक्रमाचाप्रशिक्षण कृतीआराखडामागवुन घेवुन एकत्रितकरणे.

✓ प्रशिक्षण भाराच्याअनुषंगानेअंमलबजावणीसाठीवार्षिकवेळापत्रकतयारकरणे.

✓ सर्वकार्यक्रमप्रमुखांचीदोनदिवसीय कार्यशाळाआयोजितकरुनअंतिम कृतीआराखडाआयुक्तआरोग्य सेवातथाअभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियानमुंबई यांचे कडेसंचालक, आरोग्य सेवापुणे यांचेमान्यतेनेपाठविणे.

**कालमर्यादा** ः-दुसरा व तिसराआठवडानोव्हेंबर

९. सर्व कनिष्ठ प्रशिक्षण संस्थेत कार्यरत अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल, दिर्घमुदतीची रजा, सेवापुस्तक, वेतनवाढी व इतर प्रशासकीय बाबी त्या-त्या वरिष्ठ कार्यालयाच्या अंतर्गत येतील.

- प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मुल्यामापन त्या-त्या प्रशिक्षण संस्थांचे संस्थाप्रमुख / शाखा सदस्य यांचेमार्फत दर सहा महिन्याने करण्यात येईल.

- नामनिर्देशित प्रशिक्षणार्थी गैरहजर असल्यास अथवा प्रशिक्षण संस्थांचे आवश्यकतेनुसार नामनिर्देशने न केल्यास संबंधित पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यावर म.ना.से. (शिस्त व अपील) नियम-१९७९ च्या तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.
- प्रशिक्षण पश्चात चाचणीत ज्ञान व कौशल्य प्रशिक्षणार्थीस ७०% पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास प्रशिक्षणार्थीस स्वःखर्चात व आपल्या रजा खर्ची घालून प्रशिक्षणातील ज्ञान व कौशल्य प्राप्त करावे लागेल व त्याची नोंद सेवा पुस्तकात घेण्यासाठी संबंधित पर्यवेक्षक अधिकाऱ्यांना सुचित करतील.

**१०. आर्थिक तरतूद –**

राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर (**SIHFW**) वर्षाच्या सुरवातीला प्रशिक्षण आराखडा करेल व त्यानुसार त्या आर्थिक वर्षाच्या त्या शासकीय विभागाच्या अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद करेल. राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था, नागपूर (**SIHFW**), आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण संस्था (**HFWTC**) तसेच जिल्हा आरोग्य प्रशिक्षण (**DHTC**) केंद्रासाठी लागणारी आर्थिक तरतूद त्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत करण्यात येईल. सदर प्रशिक्षण धोरण योजना म्हणून राबविण्यात येईल.